**आर.सी.सी क्र.१६२३/२०१८**
**सरकार विरुध्द. जिवन**
**निशाणी क्र.५३/क**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ४ यांची जबानी –**

मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,

**माझे नाव – श्री. हेमंत नारायण पटेल**

वय – ४३ वर्षे, व्यवसाय – व्यापार,

राहणार – भानुदास नगर, औरंगाबाद.

---

**सरतपासणी अभियोग पक्षाकरीता श्री. ए. डी. पाईकराव सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे द्वाराः–**

१. दिनांक ०४.०९.२०१८ रोजी दुपारी ०३.३० वाजता घटना घडली होती. त्यावेळी आम्हाला माझ्या वहिणीचा एकदम आवाज आला. त्याप्रमाणे मी, माझी पत्नी व माझा भाऊ असे आवाजाच्या दिशेने पळालो. विदुला मॅडमच्या क्लासेसकडे आम्ही पळालो. तेथे जावुन पाहिले असता, माझ्या वहिणीने आरोपीची कॉलर पकडली होती. आरोपीने सुध्दा माझ्या वहिणीला पकडले होते. आम्ही तेथे जावुन त्यांना सोडवले होते. माझा भाऊ प्रशांत याने पोलीसांना फोन केला. त्यानंतर पोलीस आले व आरोपीला घेवुन गेले होते. आरोपी याने वहिणीला पकडले होते व वहिणीच्या छातीला स्पर्श केला होता, साक्षीदार परत सांगतो की, छातीला दाबले होते. मी आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. जी. पी. पांडे यांच्यामार्फत उलटतपास सुरु...**

४. सदर घटनेबाबत माझी व पोलीसांची कधीही वैयक्तीक भेट झाली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०४.०९.२०१८ रोजीच्या घटनेबाबत मला पहिल्यांदाच विचारले म्हणुन मी आज रोजी न्यायालयात घटनेबाबत सांगत आहे. माझी पत्नी त्यावेळी कोणता मोबाईल क्रमांक वापरत होती हे मला आता सांगता येणार नाही. माझी पत्नी व माझी आई त्यावेळी मोबाईल फोन वापरत नव्हती. घटना हि अंदाजे अर्धा ते एक तास चालली होती. हे म्हणणे खरे आहे की, आमचे आजुबाजुच्या लोकांशी चांगले संबंध आहेत. घटनेच्या वेळी आजुबाजुचे लोक जमा झाले नाहीत. माझ्या समक्ष आरोपी म्हणुन बसलेल्या

इसमाला घटनेनंतर परत पाहण्याचा प्रसंग आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझ्या वहिणीमध्ये मैत्रीपुर्ण संबंध होते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०४.०९.२०१८ रोजी मी म्हणतो त्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वहिणीची आरोपीसोबत मैत्री आहे हे समजल्यानंतर मी ठरवुन खोटी घटना तयार केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी वहिणी हि माझ्या व माझ्या पत्नीच्या व माझ्या आईच्या व तिच्या मोबाईलवरुन आरोपीला वारंवार फोन करत होती व ज्यावेळी वेळ मिळेल तसे आरोपीला भेटायला बोलवत होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने दिनांक ०४.०९.२०१८ रोजी फिर्यादीला पकडले नव्हते अथवा तिच्याशी असभ्य वर्तन केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मैत्री असल्याचे कळल्यामुळे फिर्यादीला सांगुन हि खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला त्रास देण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

| समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृती. |
|---|---|
| RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR — Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Date: 2026.03.02 16:11:18 +0530 | RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR — Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Date: 2026.03.02 16:11:23 +0530 |
| ( श्री. आर. एस. जांबोटकर ) | ( श्री. आर. एस. जांबोटकर ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |

दिनांक– ०२/०३/२०२६.

**आर.सी.सी क्र.१६२३/२०१८**

**सरकार विरुध्द. जिवन**

**निशाणी क्र.५२/क**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ३ यांची जबानी –**

मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,

**माझे नाव – श्री. प्रशांत नारायण पटेल**

वय – ४४ वर्षे, व्यवसाय – व्यापार,

राहणार – भानुदास नगर, औरंगाबाद.

-----------------------------------------------

**<u>सरतपासणी अभियोग पक्षाकरीता श्री. ए. डी. पाईकराव सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे द्वाराः–</u>**

१. दिनांक ०४.०९.२०१८ रोजी मी घरी असतांना माझी पत्नी माझ्या मुलांना शिकवणीसाठी सोडवायला गेली होती. त्यावेळी दुपारी ०३.३० वाजले होते. मला शिकवणी जवळुन माझ्या पत्नीचा आवाज आला होता. माझ्या मुलांची शिकवणी हि आमच्या घरापासुन शंभर फुट अंतरावर आहे. मला आवाज आल्यानंतर मी, माझा भाऊ, माझ्या भावाची पत्नी असे तिघे जण शिकवणी जवळ गेलो. त्याठिकाणी गेलो असता, मी पाहिले की, माझ्या पत्नीला आरोपीने पकडले होते. आम्ही आरोपीला पत्नीपासुन वेगळे केले. मी पोलीस राठोड यांना त्यानंतर फोन केला. राठोड हे त्याठिकाणी आले व आरोपीला पोलीस स्टेशनला घेवुन गेले. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**<u>आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. जी. पी. पांडे यांच्यामार्फत उलटतपास सुरु...</u>**

४. माझ्या घरी मी, माझी पत्नी, माझा भाऊ, भावाची पत्नी, माझी व माझ्या भावाची मुले असे एकत्र राहतो. आमचे घर हे पाच खोलींचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आई वडीलांना धरुन आमच्या घरात दहा ते बारा लोक राहतात. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या आजुबाजुला शेजारी घरे हि एकमेकांना लागुन व दाट लोकवस्तीचा भाग आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घरासमोर मुख्य रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, मुख्य रस्तयावरुन लोकांचे कायम येणे–जाणे चालु असते. हे म्हणणे खरे आहे की, मी राहतो त्या भागातील सर्व लोकांशी माझे चांगले संबंध आहे, कोणाशीही भांडण नाही. माझी

व पोलीसांशी कधीही वैयक्तीक भेट झाली नाही. हे म्हणणे खरे आहे की, जी काही तक्रार घटनेबाबत दिली ती माझ्या पत्नीने दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, ११२ वर फोन केल्यानंतर माझे व पोलीसांचे काही संभाषण नाही. माझ्या भावाच्या पत्नी व माझ्या आईजवळ त्यावेळी मोबाईल फोन होता. ८८५६०९६२८९ हा मोबाईल क्रमांक त्यावेळी कोण वापरत होते ते मी आता सांगु शकत नाही. हे मला सांगता येणार नाही की, मोबाईल क्रमांक ७२४९४०९६३६ हा माझ्या नंबर माझ्या भावाची पत्नी वापरत होती. हे मला सांगता येणार नाही की, मोबाईल क्रमांक ७०५७०६८८०९ हा नंबर माझी आई त्यावेळी वापरत होती. हे मला सांगता येणार नाही की, ९०२१६२४४९६ हा नंबर माझी आई त्यावेळी वापरत होती. मला त्यावेळी माझी पत्नी कोणता नंबर वापरत होती ते मला सांगता येणार नाही. हे मला सांगता येणार नाही की, मोबाईल क्रमांक ८१४९९१८०६४ हा त्यावेळी माझी पत्नी वापरत होती. हे म्हणणे खरे आहे की, राठोड पोलीसांना फोनवर माहिती दिल्यानंतर प्रथमच मी घटनेबाबत मी आज रोजी न्यायालयात विचारले म्हणुन सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझ्या पत्नीमध्ये मैत्रीपुर्ण संबंध होते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०४.०९.२०१८ रोजी मी म्हणतो त्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीची आरोपीसोबत मैत्री आहे हे समजल्यानंतर मी ठरवुन खोटी घटना तयार केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी पत्नी हि माझ्या भावाच्या पत्नीच्या व माझ्या आईच्या व तिच्या मोबाईलवरुन आरोपीला वारंवार फोन करत होती व ज्यावेळी वेळ मिळेल तसे आरोपीला भेटायला बोलवत होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने दिनांक ०४.०९.२०१८ रोजी फिर्यादीला पकडले नव्हते अथवा तिच्याशी असभ्य वर्तन केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मैत्री असल्याचे कळल्यामुळे फिर्यादीला सांगुन हि खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला त्रास देण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

समक्ष

RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Date: 2026.03.02 16:12:11 +0530

( श्री. आर. एस. जांबोटकर )

मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

दिनांक– ०२/०३/२०२६.

श्रवणोत्तर स्वीकृती.

RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Date: 2026.03.02 16:12:16 +0530

( श्री. आर. एस. जांबोटकर )

मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद